| | |
|---|---|
| MHSN060008082025 | नियमित दिवाणी दावा नं. ६७/२०२५<br>आलमागिर वि मुस्तफा |

**<u>निशाणी ५ वरील आदेश</u>**

**०१.** वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातूर्त ताकीदीसाठी केलेला आहे. वादीने सदर अर्जाद्वारे प्रतिवादी नं. १ अगर तर्फे इसमांनी दावा कलम १–अ मधील मिळकतीतील वादी यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरहरकत अथवा अडथळा करु नये अशी तुर्तातूर्त मनाई आदेशाची मागणी केली आहे.

**०२.** वादींचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे;

अ. जिल्हा व तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी मिरज पैकी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील नरवाडे गल्ली परिसरातील वाणिज्य वापरातील दुकानजागा मिळकत त्याचा सि.स.नं. ७३४४/ब याचे क्षेत्र ७.०० चौ.मी. त्यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे,

पुर्वेस – सरकारी रस्ता

पश्चिमेस – सामाईक बोळ

दक्षिणेस – सि.स.नं. ७३४४/अ ची मिळकत

उत्तरेस – श्री. यासीन नरवाडे यांचे मिळकत

सदर चतु:सिमेतील घरजागा मिळकत त्यातील तदंगभूत वस्तुहक्कासह संपूर्ण.

ब. जिल्हा व तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी मिरज पैकी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील नरवाडे गल्ली परिसरातील घरजागा मिळकत त्याचा सि.स.नं. ७३४८ याचे क्षेत्र २४.९० चौ.मी. त्यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे,

पुर्वेस – श्री. वाहीद शेख यांची मिळकत

पश्चिमेस – सि.स.नं. ७३४९ ची मिळकत

दक्षिणेस – हंगड यांची मिळकत

उत्तरेस – सामाईक रस्ता

सदर चतु:सिमेतील घरजागा मिळकत त्यातील तदंगभूत वस्तुहक्कासह संपूर्ण.

क. जिल्हा व तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी मिरज पैकी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील नरवाडे गल्ली परिसरातील घरजागा मिळकत त्याचा सि.स.नं. ७३४९ याचे क्षेत्र १९.७० चौ.मी. त्यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे,

पुर्वेस – सि.स.नं. ७३४८ ची मिळकत

पश्चिमेस – सि.स.नं. ७३५० ची मिळकत

दक्षिणेस – हंगड यांची मिळकत

उत्तरेस – सामाईक बोळ

सदर चतु:सिमेतील घरजागा मिळकत त्यातील तदंगभूत वस्तुहक्कासह संपूर्ण.

ड. जिल्हा व तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी मिरज पैकी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील मिरज फायनल प्लॉट–टीपी ०१ स्कीमनुसार नगर भुमापन क्र. ३०१ याचे क्षेत्र ६६९.२० चौ.मी. यापैकी निम्मे हिस्सेची मिळकत त्यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे,

पुर्वेस – रस्ता

पश्चिमेस – न.म.पैकी उर्वरित मिळकत

दक्षिणेस – न.म.पैकी उर्वरित मिळकत

उत्तरेस – रस्ता

सदर चतु:सिमेतील घरजागा मिळकत त्यातील तदंगभूत वस्तुहक्कासह संपूर्ण.

इ. जिल्हा व तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी मिरज पैकी मौजे निलजी हद्दीतील शेतजमीन मिळकत त्याचा भुमापन क्र. १६०, याचे एकूण क्षेत्र हे. २.६९.०० आर, आकार रु. २५.३७ पै. त्यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे,

पुर्वेस – ऐनापुरे यांची मिळकत

पश्चिमेस – हिंगमिरे व पवार यांची मिळकत

दक्षिणेस – केसरखाने यांची मिळकत

उत्तरेस – सातपुते यांची मिळकत

सदर चतु:सिमेतील शेतजमीन मिळकत त्यातील तदंगभूत वस्तुहक्कासह संपूर्ण.

**०३.** वादीचे पुढे कथन आहे की, वर कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकती या मूळच्या फरदीन शेख यांच्या मालकीच्या होत्या. फरदीन शेख हे दि. २७.११.१९९३ साली मयत झाले असून त्यांच्या पत्नी हलिमा फरदीन शेख या दि. २२.०१.२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. कै. फरदीन शेख यांना ६ मुले आहेत. सदर वारसापैकी हारुणबाशा हे मयत असून त्यांना वादी हे वारस आहेत. तसेच अन्य मुलापैकी यासीन हा मयत असून त्यांना प्रतिवादी नं. २ व ३ हे वारस आहेत. त्याचप्रमाणे मुलीपैकी झरीना ही मयत असून त्यांना प्रतिवादी नं. ८ ते १० हे वारस आहेत. वर नमूद वारसांची दावा मिळकतीत समाईकात हिस्सा आहे. दावा मिळकती समाईकात आहेत. दावा मिळकतीत अद्याप सरस निरस मानाने तुटक वाटप झालेले नाही. दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी नं. १ ते ११ यांचा समाईकात हक्क हिस्सा गुंतलेला आहे. वादी यांना वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये २/१५ इतका सरळ व कायदेशीर हिस्सा येतो. परंतु सदरील मिळकतीचे अद्याप वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वाटप झालेले नाही. वादी नं. १ व २ हे दावा कलम १अ मधील मिळकतीमध्ये पूर्वी केबीएन हज्ज ऊमरा टूर या नावाने तर सध्या डिएस ऑनलाईन सर्व्हीसेस या नावाने मागील व्यवसाय करीत आहेत. सदरील दावा कलम १अ मधील मिळकत ही वहीवाटीने वादी यांचे ताबेत आहे. परंतु अलीकडे वादी यांची आज्ञी कै. हलिमा शेख या दिनांक २२.०१.२०२५ रोजी मयत झाले. त्यांचे पश्चात प्रतिवादी नं. १ हे दावा कलम १अ मधील वादी यांचे शांततामय कब्जेवहिवाटीस अडथळा करुन वादी यांना सदरील मिळकत रिकामी करणेकरीता दबाव टाकीत आहेत. वादी यांनी प्रतिवादी यांना दावा कलम १ मधील सर्व मिळकतींचे वाटप करुन घेऊ असे सांगितले. परंतु प्रतिवादी हे ऐकणेस तयार नाहीत व वादी यांना अरेरावीची भाषा करीत आहेत. त्यामुळे वादी यांना त्यांचा दावा कलम १ मधील मिळकतीतील २/१५ हिस्सा तुटक वाटप होऊन मिळणेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

**०४.** वादीचे पुढे कथन आहे की, प्रतिवादी नं. १ हे अन्य प्रतिवादी यांचेसोबत संगनमत करुन वादी यांची दावा कलम १अ मधील वहीवाट संपुष्टात आणू पाहत आहेत व दावा कलम १अ मधील मिळकतीचा बेकायदेशीरपणे कब्जा घेणेच्या प्रयत्नात आहेत. वादींनी सर्व प्रतिवादीना भेटून त्याबाबत विचारणा करुन दावा मिळकतीचे वाटप करुन देणेबाबत विनंती केली असता प्रतिवादी हे वादीस उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. त्यामुळे वादीनी वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये असलेला २/१५ हिस्सा तुटक वाटप करुन मागितला असता प्रतिवादी यांनी आज बघू उद्या बघू असे करीत टाळाटाळ चालविलेली आहे व वादीस वाटप करुन देण्यास जाणूनबुजुन टाळत आहेत व प्रतिवादी नं. १ हे वादी दावा कलम १अ मधील कब्जे वहीवाटीस अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादींना वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्यांचा २/१५ हिस्सा सरस निरस मानाने तुटक वाटप होऊन त्यांचे स्वतंत्र कब्जेत मिळणेसाठी व वरकलम १ अ यामध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत प्रतिवादी नं. १ व तर्फे इसम यांनी वादी यांचे कब्जेवहिवाटीस अडथळा करु नये याकरीता वादीना प्रस्तुतचा दावा करणे भाग पडले आहे. सबब, वादीने प्रतिवादी क्र. १ विरुध्द तुर्तातुर्त मनाईचा आदेश पारीत करणेबाबत विनंती केली आहे.

**०५.** प्रतिवादी नं. १ हे दाव्यात हजर झाले व त्यांनी म्हणणे दाखल करुन संपुर्ण कथन नाकारले आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, वादींचा दावा व मनाई अर्ज, त्यातील कथने प्रतिवादीस मान्य व कबूल नाहीत. वादींनी दाव्यामध्ये व मनाई अर्जामध्ये केलेली मागणी अप्रामाणिकपणाची व खोडसाळपणाच्या आहेत. वादीने दावा मिळकतीमधील व इतर हक्कातील सर्व वारसदारांना दावेकामी सामील केले नसल्याने दावेस नॉन जॉईन्डर ऑफ नेसेसरी पार्टी चा बाध येत आहे.तसेच वादीनी दावा मिळकतीच्या अनुषंगाने दावा मिळकतीमध्ये असलेल्या वस्तुस्थितीनुसार सर्व जंगम मिळकती, घर मिळकती इत्यादी सामील न केल्याने दावेस बाध येत असून या कारणास्तव दावा मुलत: रद्दबातल होणेस पात्र आहेत. वादींनी केलेली मागणी कायद्यातील तरतुदींच्या विसंगत, चुकीच्या,खोटया व रचनात्मक कथनांच्या आधारे केल्या असल्याने त्या कायदृयाने मान्य करता येणार नाहीत. या कारणास्तव प्रतिवादीने सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावे अशी विनंती केली आहे.

**०६.** वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरण तसेच दाखल दस्तऐवजांचे अवलोकन केले. त्यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारासाठी निघाले असून त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस त्यांचे बाजूने असलेचे सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचे समतोलत्व वादी यांच्या लाभात असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | अतंरीम मनाई अनुतोष न दिल्यास वादीचे पैशाने न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल, हे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर |

**<u>का र ण मी मां सा</u>**

**०७.** वादीने सि.स.नं. ७३४४/ब, ७३४८, ७३४९ चे उतारे, नगरभुमापन क्र. ३०१ चा उतारा, निलजी भुमापन क्र. ३०१, १६० चा उतारा, वादी यांचे वडीलांचा मृत्यूचा दाखला, दावा कलम १अ, १ब मधील मिळकतीचे वस्तुस्थितीदर्शक फोटो, फोटोचे बील, सीडी, प्रमाणपत्र, वादी यांचे केबीएन हज्ज अॅड उमरा टूर या आस्थापनेचे नावे असलेले शॉप अॅक्ट लायसन्सची प्रत, वादी यांचे उद्यम रजीस्ट्रेशन सर्टीफिकेटची प्रत, वादी यांनी प्रतिवादी नं. १ यांचे विरुध्द मिरज शहर पोलीस ठाणे मिरज येथे एन.सी.आर दाखल केलेली प्रत इत्यादी कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

**०८.** प्रतिवादी नं. १ यांनी सि.स.नं. ७३४४ मधील दुकानाचे शॉपअॅक्टचे लायसन्स, सि.स.नं. ७३४४,७३४७,४३४९, ३०१ मधील दुकानाचे फोटो व बील, वादीविरुध्द दिलेला तक्रारी अर्जाची प्रत, सुरेश सप्लायर्स यांनी दि. १२.०६.२०१७ रोजीचे बील, प्रतिवादी नं. १ यांनी पोलीस स्टेशनला दिलेली तक्रारीची प्रत, एअरटेल पेमेंट बँककरीता केलेल्या व्यवहाराचा तपशिल इत्यादी कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबतः–**

०९. प्रस्तुतचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असून त्याचे कारणमीमांसामधील पुर्नरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रित विशद करणेत आलेले आहेत. वादीच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकती ह्या मूळ मालक फरदीन शेख यांच्या मालकीच्या होत्या. वादी व प्रतिवादी हे त्यांचे वारस आहेत. दावा मिळकतीमध्ये अद्याप वाटप होणे बाकी आहे. दावा मिळकत १–अ मध्ये वादी हे त्यांचा व्यवसाय करतात. प्रतिवादी हे त्या मिळकतीचा ताबा घेण्याच्या प्रयत्नात आहेत.

१०. प्रतिवादीच्या कथनानुसार दावा मिळकती ही त्यांच्या ताब्यात आहे. दावा मिळकतीमध्ये पुर्वीच वाटप झालेले आहे व त्यानुसार दावा मिळकती या प्रतिवादीस मिळालेल्या आहेत. त्यांचे पुढे कथन आहे की, दावा मिळकत १–अ मध्ये प्रतिवादीचा व्यवसाय आहे. त्याअनुषंगाने त्यांनी व्यवसायाचा दुकानाचा फोटो तसेच शॉपअॅक्टचे लायसन्स दाखल केले आहे.

११. वादीच्या वकिलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीने दाखल केलेले फोटो हे दावामिळकत १–अ ची मिळकत सोडून दुस–या मिळकतीचे आहेत. त्याठिकाणी प्रतिवादीने त्यांचा व्यवसाय चालवितात. प्रतिवादीच्या वकिलांनी युक्तीवाद केला की, दावामिळकत ही प्रतिवादी यांच्या ताब्यात आहेत त्याबाबत त्यांनी शॉपअॅक्ट लायसन्स व फोटो दाखल केले आहेत.

१२. वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकत १–अ मध्ये त्यांचा ताबा असलेबाबत कथन केले आहे. प्रतिवादी ताब्यासंदर्भात साक्षीदाराचे प्रतिज्ञालेख दाखल केला आहे. परंतु पुन्हा त्याच साक्षीदाराचा ताब्याबाबत वादीतर्फे प्रतिज्ञालेख दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरच्या साक्षीदाराच्या प्रतिज्ञापत्रावर उलटतपास झाल्याशिवाय आजरोजी विश्वास ठेवता येणार नाही. वादीचा ताबा असल्याबाबत वादीने शॉपअॅक्ट लायसन्सची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. तसेच महानगरपालिकेकडे त्यांनी कर भरल्याची पावती तसेच इलेक्ट्रीक बीलेसुध्दा दाखल केली आहेत. तसेच मिळकतीची सिटी सर्वे उतारे पाहिले असता त्यामध्ये

वादी व प्रतिवादी यांची समाईकात नावे आहेत. प्रतिवादीने दाखल केलेल्या फोटोवरुन त्यांचा व्यवसाय हा प्रथमदर्शनी दुस–या ठिकाणी असल्याचे दिसते. तसेच प्रतिवादीने मिळकतीमधून वादीचे नाव कमी करुन त्यांचे नाव लावावे असा अर्जसुध्दा महानगरपालिकेकडे दिल्याचे दिसून येते. एकंदरीत कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी दावा मिळकत १–अ मध्ये वादीचा ताबा असल्याचे दिसून येते. वाटपाबाबत व कोणाला कुठला हिस्सा मिळेल याबाबी पुराव्यानंतर अंतिम टप्यात सिध्द होतील. परंतु आजरोजी वादीचे ताब्यास संरक्षित करणे योग्य होईल.

**१३.** वरील सर्व गोष्टींचा विचार करता, तसेच वादी याने हजर केलेल्या कागदपत्रांवरुन, वादीने त्यांचे बाजूने सकृतदर्शनी दावा व न्यायाचा समतोल आहे, तसेच प्रतिवादी नं. १ विरुध्द तुर्तातूर्त ताकीद न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे व वादी हे सदर प्रतिवादीविरुध्द तुर्तातूर्त मनाई मागण्यास पात्र आहे हे सकृतदर्शनी सिध्द केले आहे. सद्य परिस्थितीत अर्जाचा खर्च अंतिम निकालात समाविष्ट करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवत असून, मुद्दा क्रमांक ४ चे उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| **१.** | वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | प्रतिवादी नं. १ अगर तर्फे इसमांनी दावा कलम १–अ मधील मिळकतीतील वादी यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे पुढील आदेशापर्यंत हरहरकत अथवा अडथळा करु नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश प्रतिवादी नं. १ यांना देण्यात येतो. |
| **३.** | खर्चाबाबत आदेश नाही. |

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2025.05.09 11:41:23 +0530

ठिकाणः मिरज.
दिनांकः– ०६.०५.२०२५.

(श्री. निरंजन बा. चव्हाण)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of there P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magaretrate First Class, Miraj, Daret., Sangli. | | |
| Date of decareion / typed | :- | 06 | 05 | 2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 09 | 05 | 2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 09 | 05 | 2025 |